


‘ ज्ञान ,विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार‘
--शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे



## श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर संचलित,

# प्रताप ज्युनिअर कॉलेज ऑफ एज्युकेशन,वडणगे- निगवे दु

# कार्यशाळा


## विषय – मोबाईलवर निमंत्रण पत्रिका तयार करणे



**मार्गदर्शक:– माधुरी इंगवले**
**(Bcom_D.El.ED)**

**अध्यक्ष:-प्राचार्य डॉ. प्रकाश पाटील**

प्रमुख उपस्थिती: - प्रा. गळतगे सर, प्रा.निलजे सर,
प्रा. जगताप मॅडम, प्रा. किणेकर मॅडम, श्री. गाठ सर



दिनांक:-८/०९/२०२५
वेळ :- सकाळी ११.३० वा

"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार." शिक्षण महर्षी डॉ. बापूजी साळुंखे

## श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर

## प्रताप ज्युनिअर कॉलेज ऑफ एज्युकेशन, वडणगे निगवे दु।।

## डिजिटल कार्यक्रम पत्रिका निर्मिती कार्यशाळा

## दि. **09-09-2025**

दि.09- 09- 2025 रोजी प्रताप ज्युनियर कॉलेज ऑफ एज्युकेशन, वडणगे निगवे, येथे डिजिटल कार्यक्रम पत्रिका निर्मिती कार्यशाळा उपक्रम घेण्यात आला.या कार्यक्रमासाठी मार्गदर्शक म्हणून अध्यापक ज्युनिअर कॉलेज ऑफ एज्युकेशन तासगाव येथील माजी प्रशिक्षणार्थी कुमारी माधुरी इंगवले हिने या कार्यशाळेसाठी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून कॉलेजचे प्राचार्य डॉ. प्रकाश पाटील हे उपस्थित होते तसेच प्रमुख उपस्थिती म्हणून प्रा. श्री. गळतगे सर, प्रा. श्री. निलजे सर, प्रा. श्रीमती जगताप मॅडम, प्रा. श्रीमती किणेकर मॅडम तसेच श्री. गाठ सर, श्री नेताजी, श्री हराळे तसेच प्रथम व द्वितीय वर्षाचे छात्र अध्यापक उपस्थित होते.

या कार्यशाळेमध्ये पिक्सल लॅब या ॲपच्या सहाय्याने डिजिटल कार्यक्रम पत्रिका कशी बनवावी याचे मार्गदर्शन करण्यात आले. सर्व विद्यार्थ्यांनी स्वतःच्या मोबाईल मध्ये हे सॉफ्टवेअर डाउनलोड केले होते तसेच बऱ्याच विद्यार्थ्यांनी हे कौशल्य अगदी आनंदाने प्राप्त केले. ही कार्यशाळा छात्र अध्यापकांना खूप आवडली एक वेगळं काहीतरी शिकण्याचं आनंद त्यांच्यामध्ये निर्माण झाला.

# डिजिटल कार्यक्रम पत्रिका निर्मिती कार्यशाळा

# 9-09-2025









"ज्ञान , विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार."
शिक्षण महर्षी डॉ. बापूजी साळुंखे

**श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर संचलित,**

## प्रताप ज्युनियर कॉलेज ऑफ एज्युकेशन , वडणगे निगवे दु

**दिनांक : 10 सप्टेंबर 2025.** **वेळ : सकाळी 10:00 वा.**

## वैशिष्ट्यपुर्ण उपक्रम

## स्वच्छता अभियान

## राजाराम बंधारा कसबा बावडा , कोल्हापूर

## प्रेरणा - मा.श्री. श्रीराम साळुंखे

अध्यक्ष, विद्या समिती
कोल्हापूर विभाग प्रमुख,
श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था ,कोल्हापूर.

**सहकार्य- आरोग्य विभाग**

कोल्हापूर, महानगरपालिका.

**प्रमुख उपस्थिती : मा. प्राचार्य डॉ. प्रकाश पाटील**

**प्रा. गळतगे सर, प्रा. निलजे सर**
**प्रा. जगताप मॅडम, प्रा. किणेकर मॅडम**
**श्री. गाठ सर, श्री. हराळे सर, श्री.नेताजी सर**

**सर्व डी.एल. एड. प्रथम व द्वितीय वर्ष प्रशिक्षणार्थी**

"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार." शिक्षण महर्षी डॉ. बापूजी साळुंखे

## श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर

# प्रताप ज्युनिअर कॉलेज ऑफ एज्युकेशन वडणगेनिगवे

# यांच्यावतीने स्वच्छता मोहीम संपन्न

## दि. 10- 09- 2025

बुधवार दि. 10- 09- 2025 रोजी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचलित प्रताप ज्युनिअर कॉलेज ऑफ एज्युकेशन वडणगे निगवे यांच्या वतीने राजाराम बंधारा कसबा बावडा येथे स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. यावेळी प्लॅस्टिक पिशव्या, गौरी गणपती निर्माल्य, कुजलेली फळे ,फुले ,नारळ व इतर कचरा विद्यार्थ्यांनी खराटा, खोरे, व हाताने स्वच्छता करून जमा केला , महानगरपालिका आरोग्य विभाग आरोग्य निरीक्षक श्री. कांबळे यांचे व यांच्या टीमचे मुलांना योगदान मिळाले.

मा. प्राचार्य डॉ. प्रकाश पाटील यांच्या मार्गदर्शनातून सदर उपक्रम राबवण्यात आला. यावेळी संस्थेचे कोल्हापूर विभाग प्रमुख श्री. श्रीराम साळुंखे , राज्य गुप्तवार्ताचे सहाय्यक आयुक्त श्री. सचिन पाटील, योगेश मांडरे यांनी सदिच्छा भेट दिली व शुभेच्छा दिल्या. या स्वच्छता मोहिमेत प्रा. श्री. गळतगे, प्रा. श्री. निलजे, प्रा. श्रीमती जगताप, प्रा. श्रीमती किणेकर यांनी सहभाग नोंदवला तसेच प्रथम वर्ष व द्वितीय वर्ष छात्र अध्यापक यांनी स्वच्छता मोहीम राबवत एक ट्रॉलीभर कचरा जमा केला, सेवक श्री नेताजी धनगर व श्री के.डी हराळे यांनी परिश्रम घेतले.



# राजाराम बंधारा स्वच्छता अभियान
## दि. 12-09-2025








प्रताप ज्युनिअर कॉलेज ऑफ एज्युकेशन
व्यक्तिमत्व विकास शिबीर


ताप ज्युनिअर कॉलेज ऑ
व्यक्तिमत्व विका


'ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार'. शिक्षण महर्षी डॉ. बापूजी साळुंखे.
श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर संचलित,
प्रताप ज्युनिअर कॉलेज ऑफ एज्युकेशन वडणगे निगवे दुमाला ता. करवीर जि. कोल्हापूर.
ज्योतिर्लिंग हायस्कूल वडणगे निगवे दुमाला
बांबू सोसायटी ऑफ इंडिया महाराष्ट्र चाप्टर
यांच्या संयुक्त विद्यमाने
दिनांक १९ सप्टेंबर २०२५ वेळ ११:०० वाजता
१८ सप्टेंबर जागतिक बांबू दिनानिमित्त
पर्यावरण पूरक बांबू व त्यांचे उपयोग
मार्गदर्शक - मा. श्री. अरुण वांद्रे (बांबू अभ्यासक) मा. श्री. शाम सपाटे (उत्तम बांबू कारागीर)
प्रेरणा - मा. श्री. श्रीराम साळुंखे अध्यक्ष, विद्या समिती तथा कोल्हापूर विभाग प्रमुख,
श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर,
अध्यक्ष - प्राचार्य डॉ. प्रकाश पाटील
- प्रमुख उपस्थिती -
मा. मुख्याध्यापक श्री. व्हि. जी. परीट,प्रा. गळतगे सर, प्रा. निलजे सर,
प्रा. जगताप मॅडम, प्रा. किणेकर मॅडम,श्री. गाठ सर, श्री. कोळी, श्री. नेताजी, श्री. हराळे
डी. एल. एड. प्रथम व द्वितीय वर्ष प्रशिक्षणार्थी

"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार." शिक्षण महर्षी डॉ. बापूजी साळुंखे

## श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर
## प्रताप ज्युनिअर कॉलेज ऑफ एज्युकेशन, वडणगे निगवे दु।।
## ज्योतिर्लिंग विद्या मंदिर वडणगे निगवे दु।।
## बांबू सोसायटी ऑफ इंडिया महाराष्ट्र चाप्टर
## यांच्या संयुक्त विद्यमाने
## व्यावसायिक विकास कौशल्य
## बांबू पासून वस्तू बनविणे
## दि. 19-09-2025

दि.19- 09- 2025 रोजी प्रताप ज्युनियर कॉलेज ऑफ एज्युकेशन, वडणगे निगवे, ज्योतिर्लिंग विद्या मंदिर, वडणगे निगवे व बांबू सोसायटी ऑफ इंडिया, महाराष्ट्र चाप्टर यांच्या संयुक्त विद्यमाने आमच्या विद्यालयांमध्ये व्यावसायिक कौशल्य विकास या उपक्रमांतर्गत बांबू पासून वस्तू बनवणे याविषयी कार्यशाळा घेण्यात आली. सदर उपक्रमासाठी मार्गदर्शक म्हणून कोल्हापुरातील नामांकित मा. श्री. शाम सपाटे व मा सौ. दिपा पळसुले व चंद्रकांत पळसुले हे उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून आमच्या कॉलेजचे प्राचार्य डॉ. प्रकाश पाटील हे उपस्थित होते तसेच प्रमुख उपस्थिती म्हणून शाळेचे मुख्याध्यापक मा. श्री. व्ही.जी.परीट तसेच प्रा. श्री. गळतगे सर, प्रा. श्री. निलजे सर, प्रा. श्रीमती जगताप मॅडम, प्रा. श्रीमती किणेकर मॅडम तसेच श्री. गाठ सर, श्री नेताजी, श्री हराळे तसेच प्रथम व द्वितीय वर्षाचे छात्र अध्यापक, ज्योतिर्लिंग विद्या मंदिर येथील विद्यार्थीही उपस्थित होते.

सर्वप्रथम मा. श्री. शाम सपाटे यांनी बांबू विषयक बनविल्या जाणाऱ्या विविध वस्तूंची माहिती तसेच बांबू वस्तू तयार करण्याचे प्रशिक्षण केंद्र याविषयी माहिती दिली तसेच यानंतर सौ. दीपा पळसुले व चंद्रकांत पळसुले या कारागिरांनी आकाश कंदील कसा बनवावा याचे उत्तम प्रशिक्षण दिले. या प्रशिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये खूप आनंद व उत्साह दिसत होता. वस्तू बनविण्याची आवड ही दिसत होती, एकूण वेगळाच उत्साह वेगळच वातावरण निर्माण झालं होतं. कार्यक्रमाचे अध्यक्ष कॉलेजचे प्राचार्य डॉ. प्रकाश पाटील यांनी अध्यक्षीय मार्गदर्शन केले.

कार्यशाळेचे प्रास्ताविक प्रा. श्री. गळतगे, प्रमुख मार्गदर्शकांचा परिचय प्रा. श्रीमती जगताप मॅडम, कार्यक्रमाचे आभार प्रा. श्री. निलजे सर तसेच कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा श्रीमती किणेकर मॅडम यांनी केले. कार्यशाळा उत्साहात पार पडली.

















बांबू विषयक बनविल्या जाणाऱ्या वस्तूंचे प्रदर्शन





"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार." शिक्षण महर्षी डॉ. बापूजी साळुंखे

## श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर
## प्रताप ज्युनिअर कॉलेज ऑफ एज्युकेशन, वडणगे निगवे दु।।
## प्रेरणा उत्सव अंतर्गत
## मा. पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या जीवनपट
## दि. 19-09-2025

दि.19- 09- 2025 रोजी प्रताप ज्युनियर कॉलेज ऑफ एज्युकेशन, वडणगे निगवे, येथे स्कूल शिक्षा व साक्षरता विभाग यांच्यामार्फत प्रेरणा उत्सव या उपक्रमांतर्गत माननीय प्रधानमंत्री नरेंद्र मोदीजी यांच्या जीवनपटावर आधारित चित्रपट दाखविण्याचा उपक्रम घेण्यात आला.या कार्यक्रमासाठी कॉलेजचे प्राचार्य डॉ. प्रकाश पाटील हे उपस्थित होते तसेच प्रमुख उपस्थिती म्हणून प्रा. श्री. गळतगे सर, प्रा. श्री. निलजे सर, प्रा. श्रीमती जगताप मॅडम, प्रा. श्रीमती किणेकर मॅडम तसेच श्री. गाठ सर, श्री नेताजी, श्री हराळे तसेच प्रथम व द्वितीय वर्षाचे छात्र अध्यापक उपस्थित होते.

देशाचे पंतप्रधान माननीय नरेंद्र मोदी जी यांच्या जीवनावरील चित्रपटामधून आम्हा सर्वांना एक प्रेरणा मिळाली. जीवनामध्ये येणारे विविध प्रसंग, अडचणी प्रसंगी सुद्धा योग्य निर्णय घेऊन जीवनात वाटचाल कशी करावी, त्यांच्या या चित्रपटातून उत्तम असे अनुभव आम्हाला मिळाले. हा चित्रपट सर्वांना खूप आवडला एक उत्साह पूर्ण वातावरण निर्माण झाले.

प्रेरणा उत्सव अंतर्गत
पंतप्रधान नरेंद्र मोदीजी जीवनावर आधारित चित्रपट

